महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १८ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १४३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### गरज राजकीय पक्षांच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीची

राज्यात नगरपालिका, नगर परिषदा साठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी महायुती व महाविकास आघाडीत सत्तेसाठी: युतीत कुस्ती, आघाडीत बिघाडी झाल्याचे चित्र दिसत आहे. निवडणुकीच्या राजकारणात वाढता अविश्वास .

राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा युतीमधील ताणतणाव आणि आघाड्यांतील संघर्ष डोकं वर काढू लागले आहेत. निवडणुका जवळ आल्या की युतीतील पक्षांमध्ये कुस्ती सुरू होते आणि आघाड्या मोडण्याची बिघाडी दिसू लागते—जणू राजकारणाचे चक्रच असे तयार झाले आहे की सत्तेचा हिशोब ठेवताना विचारधारेपेक्षा पदांची विभागणी महत्त्वाची ठरते. युतीतील पक्षांची जाहीर मैत्री आणि आडून चालणारी कटकारस्थाने हा आता नवीन ट्रेंड नाही. निवडणुकीत जिंकण्यासाठी एकत्र येणारे पक्ष प्रत्यक्षात क्षेत्र वाटप, उमेदवारांची निवड आणि नेतृत्वाचे वर्चस्व यावरून एकमेकांशी भिडताना दिसतात. या कुस्त्या बाहेरून मैत्रीपूर्ण दिसतात, पण आतून ती चढाओढ, संशय आणि वर्चस्वाच्या राजकारणाची लढाई असते.

दुसरीकडे आघाड्यांतील बिघाडी अधिक धोकादायक. कारण आघाडी म्हणजे विचारांच्या जवळीकतेवर, धोरणात्मक समानतेवर आणि दीर्घकालीन स्थैर्यावर आधारित रचना. पण अनेक ठिकाणी ही आघाडी फक्त सत्तेसाठी असते. परिणामतः छोट्या वादातून मोठा कलह निर्माण होतो आणि काही महिन्यांतच आघाडी डळमळते.

या युती-आघाड्यांतील अस्थैर्याचे सर्वात मोठे नुकसान जनतेलाच झेलावे लागते.विकासाची कामे ढासळतात,निर्णयांमध्ये दिरंगाई होते,प्रशासनावर राजकीय दडपण वाढते, आणि शेवटी संपूर्ण राजकीय व्यवस्थेबद्दलचा विश्वास डळमळतो.

मतदारांच्या दृष्टीने ही परिस्थिती अत्यंत दिशाभूल करणारी आहे. निवडणुकीत एकत्र येणारे पक्ष काही महिन्यांतच एकमेकांना विरोधात उभे ठाकतात, तर मग मतदारांनी कोणावर विश्वास ठेवावा? धोरणांपेक्षा राजकीय गणितांना प्राधान्य देणाऱ्या या पद्धतीमुळे लोकशाहीची गुणवत्ता कमी होते.

युतीतील कुस्ती आणि आघाडीत बिघाडी थांबवायची असेल, तर पक्षांनी स्पष्ट धोरणे, पारदर्शक करार आणि लोकाभिमुख कार्यपद्धती स्वीकारणे गरजेचे आहे. सत्तेच्या वाटेकोरीपेक्षा स्थिर शासन आणि विकासाचे उद्दिष्ट अधिक महत्त्वाचे आहे, हे पक्षांनी लक्षात घेतले पाहिजे.राजकारण हे विश्वासावर चालते. आणि विश्वास तुटू लागला की कोणतीही युती टिकत नाही, कोणतीही आघाडी मजबूत राहत नाही. म्हणूनच, आजची गरज म्हणजे—स्वार्थापेक्षा सिद्धांत, सत्तेपेक्षा स्थैर्य आणि युतीपेक्षा जनतेचा विश्वास अधिक महत्त्वाचा मानणारे राजकारण.

## नवीन शैक्षणिक धोरण युवा पिढीचे भवितव्य घडवणार

### - उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण युवा पिढीचे भवितव्य घडवणारे आहे. हे शैक्षणिक धोरण अतिशय व्यावहारिक तसेच सर्जनशीलतेस बळ देणारे आणि आधुनिक स्पर्धेत विद्यार्थ्यांना पुढे नेणारे आहे असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील केले.



विलेपार्ले येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे डिझाईन क्षेत्रातील भविष्यातील संधीसाठी उर्मीज आर्ट फोरम तर्फे आयोजित "नेक्स्ट इन डिझाईन फ्युचर या युएएफ एक्सपोचे उद्घाटन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. नवे शैक्षणिक धोरण व्यावहारिक असून, यात संशोधनावरही भर देण्यात आला आहे. याशिवाय नव उद्योजक, स्टार्टअप यांना प्रोत्साहन दिले. त्यासाठी कमी व्याजावर कर्ज उपलब्ध करून दिले जात असून, बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून मदतही केली जात आहे. यातूनच स्टार्टअपच्या क्षेत्रात भारत आघाडीवर असल्याचे पाटील यांनी यावेळी सांगितले.

## हायस्पीड बुलेट ट्रेनला तक्रारींचा ब्रेक !

### हायस्पीड रेल्वे स्टेशन आराखड्याविरोधात दिव्यातून दोन हजार तक्रारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : केंद्र सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या ठाणे हायस्पीड (बुलेट) रेल्वे स्थानकासाठी स्थानिक क्षेत्र विकास आराखडा तयार करण्यात आला असून यात दिवा परिसरातील अनेक गावांमधील शेतकऱ्यांच्या जमीनी बाधित होणार आहेत. मात्र, हा आराखडा तयार करण्यापुर्वी स्थानिकांना विश्वासात घेण्यात आलेले नसून या प्रकल्पामुळे भुमीहिन होण्याची भिती व्यक्त करत सुमारे दोन हजार शेतकऱ्यांनी या प्रकल्पाविरोधात तक्रारी नोंदिवल्या. यामुळे पालिका मुख्यालयात येथीस शेतकऱ्यांच्या मोठ्या रांगा लागल्याचे चित्र दिसून आले.**

**या क्षेत्रात ठाणे महापालिका क्षेत्रातील दातिवली, म्हातार्डी, बेतावडे, आगासन तर, कल्याण- डोंबिवली महापालिका क्षेत्रातील आयरे, कोपर, भोपर, नांदिवली (पंचानंद), काटई आणि उसरघर या भागांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या जमीनी प्रकल्पात बाधित होणार असून त्यास शेतकऱ्यांनी विरोध करण्यास सुरूवात केली आहे. काही दिवसांपुर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण ग्रामीण जिल्हा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी विरोध दर्शविला होता. त्यापाठोपाठ आता शिंदेच्या शिवसेनेचे माजी नगरसेवक रमाकांत मढवी यांच्यासह दोन हजार नागरिकांनी या प्रकल्पाविरोधात पालिकेत तक्रारी नोंदविल्या आहेत.**

केंद्र सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या ठाणे हायस्पीड (बुलेट) रेल्वे प्रकल्पाचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. या प्रकल्पातील एक स्थानक ठाणे महापालिका क्षेत्रातील म्हातार्डी येथे उभारण्यात येत आहे. असे असतानाच, बुलेट रेल्वे स्थानकाकरीता स्थानिक क्षेत्राचा विकासही करण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता. त्यासाठी जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी (जेआयसीए) च्या मार्गदर्शनाखाली बुलेट रेल्वे स्थानकासाठी स्थानिक क्षेत्र विकास आराखडा तयार करण्यात आला आहे.

## आसनगाव स्थानकाचा होणार कायापालट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दरम्यान, आसनगाव स्थानकांत प्रशासनाच्यावतीने विविध कामे केली जात आहेत. मात्र, सुरू असलेली कामे संथगतीने होत असल्याच्या तक्रारी कल्याण- कसारा, कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेकडे आल्या होत्या. त्याअनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांसोबत पाहणी करण्यात आली. यावेळी आसनगाव स्टेशन मास्तर सुहास मणियार, रेल्वेचे आयओडब्ल्यूचे वरिष्ठ विभाग अभियंता आशिष दुबे, तसेच कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष राजेश घनघाव हे उपस्थित होते. ३१ मार्च २०२६ पर्यंत पुर्ण करण्याचा प्रयत्न आहे असे अधिकाऱ्यांनी पाहणी दरम्यान सांगितले.**

**ठाणे** - मुंबईकरांची जीवनवाहिनी असणाऱ्या मध्य रेल्वेची प्रवासी संख्या दिवसागणिक वाढू लागली आहे. सकाळ आणि सायंकाळच्यावेळी लोकल गाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. अनेकदा गर्दीमुळे अपघात होऊन प्रवाशांचे प्राण जात असतात. मात्र, लोकल प्रवास सुखकर व्हावा या उद्देशाने मध्य रेल्वेच्यावतीने विविध प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. यामध्ये फलाटाचे विस्तारिकरणासह अनेक कामे केली जाणार आहेत. दरम्यान आसनगाव रेल्वे स्थानकात विविध कामे सुरू असून ही कामे २०२६ मध्ये पुर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांच्यावतीने सांगण्यात आले आहे.

मध्य रेल्वे ही मुंबईकरांची जीवनवाहिनी आहे. रेल्वे मार्गावरून दिवसाला लाखो प्रवासी प्रवास करतात. जलद तसेच धिम्या लोकल गाड्या प्रवाशांनी भरलेल्या असतात. रोजचा रेल्वे प्रवास काही प्रमाणात सुखकर व्हावा या उद्देशाने प्रशासन विविध उपयायोजना राबवत असते. दरम्यान, ठाण्या पलीकडील कर्जत आणि कसारा पर्यंतच्या स्थानकांत विविध कामे सुरू करण्यात आली आहेत.आसनगाव हे शहापूर तालुक्यातील महत्वाचे स्थानक आहे. आसनगाव स्थानकातून सुमारे ७५ हजार प्रवाशी प्रवास करतात. मागील पाच वर्षापूर्वी आसनगाव स्थानकाची हरित स्थानकात नोंद करण्यात आली. तसेच कल्याण-कसारा, कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेने आसनगाव स्थानकात पोलीस स्थानकाची उभारणी व्हावी म्हणुन प्रशासनाकडे आठ वर्षे पाठपुरावा केला होता. यंदा आसनगाव येथे नवीन पोलिस स्थानक उभारण्यात आले असून ५८ पोलिस अधिकारी आणि कर्मचारी प्रवाशांच्या सेवेसाठी कार्य करीत आहेत.



### आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात

## नवीन बी-बियाणे कायदा

### -केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** निकृष्ट व अनधिकृत बीज विक्रीवर नियंत्रणासाठी आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवीन बी बियाणे कायदा आणण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. तसेच महाराष्ट्रात बागायती पिकांना गुणवत्तापूर्ण रोपसामग्री मिळावी यासाठी तीन क्लीन प्लांट सेंटर स्थापन केले जात असल्याचेही त्यांनी जाहीर केले. आशियाई बी बियाणे परिषदेत ते बोलत होते. या परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

शेतकऱ्यांच्या परवडणाऱ्या दरात गुणवत्तापूर्ण बीज उपलब्धतेची गरज व्यक्त करत केंद्रीय कृषी मंत्री चौहान यांनी बी बियाणे उद्योगाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करावा, असे आवाहन केले. दलहन व तिळहन उत्पादनात खासगी क्षेत्राचे योगदान कमी असल्याने आयातीवरील अवलंबित्व वाढल्याचे सांगत त्यांनी बी बियाणे कंपन्यांनी या क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही नमूद केले. बीजांची उत्पादन तसेच वितरण साखळी पारदर्शक करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'साथी पोर्टलवर सर्व बीज कंपन्यांनी १०० टक्के नोंदणी करणे बंधनकारक राहील, असेही त्यांनी सांगितले.

### आदिवासी वाड्यांवरील नागरी समस्या सोडवण्यासाठी

## सोनाळे ग्रामपंचातीवर श्रमजीवीचे आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी तालुक्यातील सोनाळे ग्रामपंचायती मध्ये समाविष्ट असलेल्या खैरपाडा, इंदाले पाडा,शिरवाचा पाडा या आदिवासी पाडा - वाड्यांवर नागरी समस्यांमुळे स्थानिक ग्रामस्थ त्रस्त आहेत. याबाबत वारंवार माहिती तक्रार देऊन सुध्दा दुर्लक्ष होत असल्याने ग्रामपंचायत प्रशासनाने या नागरी समस्यांची तातडीने सोडवणूक करण्यासाठी श्रमजीवी संघटनेच्यावतीने ग्रामपंचायत कार्यालया बाहेर निदर्शने करीत घोषणाबाजी करून आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात स्थानीक आदिवासी वाड्यां वरील महिला व नागरिकांसह श्रमजीवी संघटनेचे सदस्य सहभागी झाले होते. तालुकाध्यक्ष सागर देसक, शहध्यक्ष प्रदीप चौधरी , तानाजी लहांगे गौतम पाटील,गणेश सपाटे अदि



पदाधिकारी व सदस्य,ग्रामस्थ सहभागी झाले होते. भिवंडी तालुक्यातील सोनाळे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील खैरपाडा, इंदाले पाडा,शिरवाचा पाडा येथील आदिवासी कुटुंबियांच्या वस्ती असलेल्या जमिनींना अधिकृत गावठाण म्हणून मान्यता नसल्याने शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही.त्यामुळे येथील गावठाण जमिनीस अधिकृत गावठाण म्हणून मान्यता द्यावी.व त्यांच्या घरांना घरपट्टी लावावी.या पाड्यांवर अपुरी शौचालय व्यवस्था असल्याने येथे पर्याप्त शौचालय बनविण्यात यावे.स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्रत्येक घराला व्यक्तिगत शौचालय दिले जावे.वाड्यांमध्ये पिण्यास योग्य पाणी उपलब्ध नाही त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने या पाड्यांवर विहिरी,बोअरवेल दुरुस्ती व नवीन पाणीपुरवठा योजना तात्काळ कार्यान्वित कराव्यात अशा अनेक प्रलंबित मागण्या आंदोलनकर्त्यांनी करीत सोनाळे ग्रामपंचायत कार्यालयासमोर धरणे आंदोलन करीत जोरदार घोषणाबाजी करून निदर्शने केली. त्यानंतर शिष्टमंडळाने ग्रामपंचायत सरपंच रुपाली जितेंद्र मानकर यांना निवेदन दिले.त्यांनी लवकरच या समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन शिष्टमंडळास दिले.



## दुचाकी चालवू न दिल्याचा राग

### ठाण्यात तरुणाने पेटवली नऊ वाहने

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : कोपरी येथे मैदाना उभी असलेली नऊ वाहने एका तरुणाने पेटवून दिल्याचा प्रकार सोमवारी उघडकीस आला आहे. याप्रकरणी कोपरी पोलीस ठाण्यात तरुणाविरोधात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. रविंद्र परिहार (३०) असे त्याचे नाव असून मित्राने दुचाकी चालविण्यास दिली नाही म्हणून त्याने हे कृत्य केल्याचे प्राथमिक तपासात उघडकीस येत आहे. याप्रकरणाचा सखोल तपास सुरु असल्याची माहिती कोपरी पोलिसांनी दिली. या घटनेत पेटलेली सर्व वाहने ही दुचाकी प्रकारातील आहेत.

कोपरी येथील गांधीनगर भागातील एका मोकळ्या मैदानात येथील रहिवासी त्यांची वाहने उभी करतात. सोमवारी पहाटे ४ वाजताच्या सुमारास अचानक वाहनांनी पेट घेतला. घटनेची माहिती कोपरी पोलीस, ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दलाला मिळाल्यानंतर पथके घटनास्थळी दाखल झाले.







## लाडक्या बहिणींच्या ई केवायसीला मुदतवाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील महिलांची ई-केवायसी (Ladki Bahin E-KYC) प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर सुरू असताना, अलिकडे काही जिल्ह्यांमध्ये उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्ती, महिलांनी उपस्थित केलेल्या अडचणी लक्षात घेता. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली ई-केवायसी करण्याची दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत निर्धारित अंतिम मुदत वाढवून आता ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. अलीकडील नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच काही महिलांच्या पती किंवा वडिलांचे निधन झाल्यामुळे संबंधित आधार क्रमांकावर ओटीपी प्राप्त होणे अशक्य झाले आहे. अशा परिस्थितीत अपूर्ण ई-केवायसी प्रक्रियेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तसेच, ज्या पात्र महिलांच्या पती किंवा वडील हयात नाहीत किंवा ज्या महिला घटस्फोटित आहेत अशांनी स्वतःची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून संबंधित मृत्यू प्रमाणपत्र, घटस्फोट प्रमाणपत्र किंवा माननीय न्यायालयाचा आदेश यांची सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहील. या अनुषंगाने पात्र महिलांना न्याय मिळावा आणि कोणतीही पात्र महिला तांत्रिक किंवा अपरिहार्य कारणांमुळे योजनेपासून वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे. याकरिता माननीय मुख्यमंत्री व दोन्ही माननीय उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या हिताचे भान राखत ई-केवायसी प्रक्रियेस ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच विस्तारित कालावधीत लाभार्थींनी आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहनही मंत्री तटकरे यांनी केले आहे.

# 'हिंदु जनजागृती समितीचा राज्यव्यापी राष्ट्रभक्ती जागरण सप्ताह



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

भारत राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याचे प्रेरणास्थान ठरलेल्या आणि कोट्यवधी भारतियांमध्ये क्रांतीची ज्वाळा चेतविणाऱ्या 'वंदे मातरम्' गीताला यंदा १५० वर्षे पूर्ण झाली. या स्मरणार्थ हिंदु जनजागृती समितीच्या वतीने राज्यभर विशेष राष्ट्रभक्ती जागरण उपक्रम एक सप्ताहभर आयोजित करण्यात आला. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी सामूहिक 'वंदे मातरम्' गायनातून नागरिकांनी मातृभूमीप्रती अभिमान व्यक्त केला.

या उपक्रमास महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सातारा, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, रत्नागिरी, मुंबई आदी ठिकाणी नागरिकांनी राष्ट्रध्वज आणि क्रांतीकारकांचे फलक हातात धरून "वंदे मातरम्"चा जयघोष केला. महाराष्ट्रासह कर्नाटक आणि गोवा राज्यांतही या उपक्रमाचा विस्तार झाला.

**हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग**

### राज्यात ६० हून अधिक ठिकाणी सामूहिक वंदे मातरम् गायन

महाराष्ट्र राज्यातील ६० हून अधिक ठिकाणी आयोजित सामूहिक गायन कार्यक्रमात पाच हजारांहून अधिक राष्ट्रभक्त नागरिक, माजी सैनिक, शिक्षक, विद्यार्थी, तसेच विविध सामाजिक आणि हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले. कोल्हापूर येथे आमदार राजेश क्षीरसागर आणि अन्य मान्यवरांनी या उपक्रमाचे उद्घाटन करून देशभक्तीचा संदेश दिला.

हिंदु जनजागृती समितीचे राज्य संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले, "बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेले 'वंदे मातरम्' हे गीत आज १५० वर्षांनंतरही प्रत्येक भारतीयाच्या हृदयात राष्ट्रप्रेमाची ज्वाला चेतवत आहे. या गीताची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी, यासाठी आम्ही शाळा आणि महाविद्यालयांमध्ये संपूर्ण 'वंदे मातरम्' गायले जावे, असे आवाहन करीत आहोत."

# " बाल विवाह मुक्त महाराष्ट्राचा " संकल्प

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता :** बालविवाह रोखण्यासाठी १५ ऑक्टोबर ते २६ जानेवारी हे अभियान महाराष्ट्रभर राबविण्यात येत आहे. बालविवाह हा खोलवर रुजलेला सामाजिक प्रश्न आहे . बालविवाहा मुळे विशेषता मुलीच्या आयुष्यावर अनिष्ट परिणाम होतो. आरोग्यावर , शिक्षणावर व एकूणच तिच्या हक्कांवर वर विपरीत परिणाम होतो बालविवाह प्रतिबंधक कायद्याची माहिती देण्यात येईल व बालविवाह होऊ न देण्याची प्रतिज्ञा विद्यार्थी घेतील.

# भिवंडीत मुलीने पळविले आईचे सोन्याचे दागिने

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता /भिवंडी :** भिवंडी शहरातील कामतघर परिसरात राहणाऱ्या एका सज्ञान मुलीने घरातून पळून जाताना तिने घरातील सव्वा लाखांचे सोन्याचे दागिने घेऊन पलायन केल्याची खळबळजनक घटना नुकतीच घडली आहे.या प्रकरणी घरातील पालकांनी दिलेल्या तक्रारी वरून पोलिसांनी मुली विरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भिवंडी शहरातील कामतघर हनुमान नगर परिसरात राहणारे रामबालक बिहारी मोहतो यांची १८ वर्षे वयाची सज्ञान असलेली मुलगी २२ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास घरातून पलायन केले.यावेळी तिने आईचे वापरत असलेले एक लाख ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरी केले.याप्रकरणी मुलीने राहते घरातील बेडरुम मधील कपाटातून लबाडीने स्वतःच्या फायद्या करीता चोरी करुन घेउन गेली म्हणून पालकांनी दिलेल्या तक्रारीनंतर नुकताच भिवंडी शहर पोलिस ठाण्यात मुली विरोधात गुन्हा दाखल केला करण्यात आला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णदेव खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# जीवनदीप महाविद्यालय गोवेलीत अविष्कार संदर्भात उद्बोधन कार्यशाळा







**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली :** समाजामध्ये व शैक्षणिक क्षेत्रात संशोधनाला फार महत्त्व आहे याचा संशोधनाची सुरुवात महाविद्यालयापासून व्हावी याकरिता जीवनदीप महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या आविष्कार या संशोधन प्रकल्पासंदर्भात IQAC व संशोधन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने उद्बोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

जीवनदीप महाविद्यालयात वरिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक वर्ग व अविष्कार मध्ये सहभागी होण्याकरता इच्छुक विद्यार्थी हे या कार्यशाळेला उपस्थित होते. सदर कार्यशाळेमध्ये अविष्कार बाबत मार्गदर्शन करण्यासाठी कुलदीपसिंग राठोड (वाणिज्य विभाग. बी. एन. एन. कॉलेज भिवंडी) हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थी व प्राध्यापक यांना कशाप्रकारे आविष्कार करता प्रकल्प तयार करायचे याकरता मार्गदर्शन केले तसेच आपण आपले प्रवेश कशाप्रकारे निश्चित करावे, कोणत्या गोष्टी प्रकल्पामध्ये असायला हव्यात विविध विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे, प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, संशोधन समिती प्रमुख डॉ. विजय हेरोडे, IQAC समन्वयक प्रा.प्रियांका पाटील , इतर विभाग प्रमुख व प्राध्यापक, विद्यार्थी या उद्बोधनपर कार्यशाळेला उपस्थित होते.सर्वांच्या उपस्थितीत सदर कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली.

# ठाणे महापालिकेतर्फे ज्येष्ठ नागरिक दिन साजरा

- **खासदार नरेश म्हस्के यांची प्रमुख उपस्थिती**
- **व्याख्यान आणि संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाणे महापालिका आणि ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समिती, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी गडकरी रंगायतन येथे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास खासदार नरेश म्हस्के प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.





ज्येष्ठ नागरिक हा अनुभवाचा ठेवा असतो. त्याच्या अनुभवाचा, माहितीचा सगळयांना फायदा व्हावा, यासाठी त्यांच्याशी संवाद वाढवणे आवश्यक असते. अशाप्रकारचा कार्यक्रम ठाणे महापालिकेतर्फे आयोजित केला जावा यासाठी आपण प्रथमपासून पुढाकार घेतल्याचे प्रतिपादन खासदार नरेश म्हस्के यांनी केले. तसेच, जीवनाच्या प्रत्येक वळणावर लढा देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा प्रत्येक शब्द अनमोल असतो, असेही खासदार म्हस्के म्हणाले.

याप्रसंगी, माता पिता आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७ या कायद्याशी निगडित अनुभवांचे विवेचन उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी यांनी केले.

तर, प्रास्ताविकात ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष प्रकाश दिघे यांनी समितीचे कार्य, ज्येष्ठ नागरिक संघाला आवश्यक असणाऱ्या सुविधा, कार्यालयांसाठी जागा याबद्दलचे निवेदनही सादर केले. याप्रसंगी व्यासपीठावर, उपायुक्त (समाजविकास) अनघा कदम, समितीचे उपाध्यक्ष रवींद्र दळवी उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न, कायद्यातील तरतुदी यांच्याबाबत ॲड. प्रमोद ढोकले यांनी केलेल्या मार्गदर्शनपर व्याख्यानाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर, मेघना आणि हेमंत साने संचालित 'दिल की आवाज' हा जुन्या मराठी आणि हिंदी गीतांचा मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर करण्यात आला.

या कार्यक्रमापूर्वी, हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने गडकरी रंगायतनमधील त्यांच्या प्रतिमेस खासदार नरेश म्हस्के यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्याप्रसंगी, उपायुक्त उमेश बिरारी, उपायुक्त अनघा कदम, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, उप माहिती व जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर, ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष प्रकाश दिघे, ॲड. प्रमोद ढोकले आदी उपस्थित होते.

# वन्यजीव मित्रांना विमा प्रमाणपत्राचे वितरण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण :** शहापूर तालुक्यातील वासिंद जवळील असलेल्या तानसा व वैतरणा अभयारण्यात मोठ्या प्रमाणात वन्यजीव वास्तव्य करीत आहे तसेच या अरण्यात विविध औषधी वनस्पतीं मोठ्या प्रमाणात आहेत या वनातील वन्यजीव व वनस्पती यांचे जतन करण्यासाठी काही व वन्यजीव मित्र अतिशय मेहनत घेत असतात यासाठी वनपरिक्षेत्राचे अधिकारी दर्शन ठाकूर यांच्या प्रयत्नामुळे व रोटरी क्लब ऑफ डोंबिवली यांच्या वतीने नुकतेच विमा प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.



शहापूर तालुक्यातील दुर्गम क्षेत्रामध्ये वन व वन्यजीव संवर्धन कार्यामध्ये सहभाग घेणारे अथवा वन व वन्यजीव यांचे बचाव कार्य करण्यामध्ये वनविभाग व स्थानिक नागरिक यांना मोलाची मदत करणारे वन्यजीव मित्र हे विविध अडी-अडचणीवर मात करून आणि वेळप्रसंगी धोका पत्करून वन्यजीवांचे बचाव कार्य करत असताना झालेल्या अपघात, दुखापत किंवा जीवित हानी याबद्दल कोणताही आधार नसल्याने अशावेळी या मित्रांना कुठल्याही प्रकारचे विमा संरक्षण नव्हते त्यामुळे या वन्यजीव मित्रांना विमा संरक्षण मिळावे यासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी दर्शन ठाकूर हे गेल्या चार पाच वर्षांपासून प्रयत्नशील होते.

त्यांच्या या प्रयत्नांमुळे रोटरी क्लब ऑफ डोंबिवली यांच्या सहाय्याने व न्यू इंडिया एश्योरेंस कंपनी माध्यमातून तालुक्यातील 25 वन व वन्यजीव मित्रांना एक वर्ष भराचा विमा संरक्षण देऊन सदर विमा प्रमाणपत्र वितरण करण्यात आले असून राज्यात प्रथमच वन्यजीव मित्रांना विमा वाटण्यात यश आले आहे तर यापुढेही हा विमा सुरू ठेवू असे आश्वासन दिले आहे त्यामुळे भविष्यामध्ये अशा प्रकारच्या विम्यासाठी जिल्हा, राज्य स्तरावर व देश पातळीवर हा उपक्रम राबवता येईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे रोटरी क्लबच्या अध्यक्षा स्नेहल शिंदे यांनी म्हटल्याचे वनक्षेत्रपाल दर्शन ठाकूर यांनी सांगितले.

यावेळी रोटरी क्लबच्या अध्यक्षा स्नेहल शिंदे, जिल्हा सचिव विनेश नायर, सहसचिव स्वप्नील कडू,वनक्षेत्रपाल दर्शन ठाकूर, सार्जंट ऑफ आर्म अमित महाजन, गणेश बोलाडे, डॉ. प्रमोद शिंदे, डॉ. दिलीप काकवीपुरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत शिराळ, सूत्रसंचालन रोहीदास डगळे तर आभार भूषण विशे यांनी केले.

# चांदिवली येथे निरंकारी भक्तांचे रक्तदान



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** मानवसेवेच्या प्रति आपली बांधिलकी आणखी सदृढ करत संत निरंकारी मिशन मार्फत रविवारी, चांदीवली स्थित कम्युनिटी हॉल मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन केले. ज्यामध्ये मिशनच्या चांदिवली व पवई शाखांतील भक्तांनी उत्साहाने भाग घेतला. संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या एकंदर 81 निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. रक्त संकलनाचे कार्य संत निरंकारी रक्तपेढी, विलेपार्ले मार्फत करण्यात आले. उल्लेखनीय आहे, की 115 इच्छुकांनी स्वेच्छा रक्तदानासाठी अगोदरच आपली नावे नोंदविली होती. शिबिराचा शुभारंभ स्थानिक सेक्टर संयोजक प्रकाश जोशी आणि माजी नगरसेवक ईश्वर तायडे यांच्या मुख्य उपस्थितित निरंकार परमात्माचे ध्यान व प्रार्थना करुन करण्यात आला. या प्रसंगी दोन्ही शाखांचे मुखी तसेच सेवादल अधिकारी उपस्थित होते. या रक्तदान शिबिराला साकीनाका पोलीस ठाण्याचे ए.पी. आई. झोले व भामरे यांनी सदिच्छा भेट दिली. सर्व मान्यवरांनी मानवी मूल्यांना प्रोत्साहित करणे तसेच विश्वबंधुत्वाची भावना सशक्त बनविण्याच्या संत निरंकारी मिशनच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची प्रशंसा केली. हे रक्तदान शिबिर सेवादल स्वयंसेवक तसेच संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी उत्तमप्रकारे राबविले.

# सरळगाव जि. प. गटात अश्विनी खापरे प्रबळ दावेदार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचे अत्यंत विश्वासू सहकारी युवा उद्योजक हरेश खापरे यांच्या पत्नी सौ. आश्विनी हरेश खापरे या सरळगाव जि. प. गटातून निवडणूक लढण्यास इच्छुक असून त्या भाजपाच्या प्रबळ दावेदार असल्याचे बोलले जात असून त्यादृष्टीने त्यांनी पावले उचचली असल्याचे दिसत आहे.

आज त्यांनी सरळगाव जिल्हा परिषद गटातील साखरे, किसळ, भालकीचापाडा, नांदगाव, माणिवली, इंदिरावाडी, नेवाळपाडा, लिहेपाडा, माजगाव, दहिवली, पारतले, अस्कोत, ब्राह्मणपाडा या गावांमध्ये भव्य हळदीकुंकू सोहळा व साडी वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रत्येक गावात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

"समाज आपल्याला खूप काही देतो... त्यातील थोडं तरी परत देणं ही माझी कर्तव्यभावना आहे" अशा उदात्त विचारातून सौ. अश्विनी खापरे यांनी हा उपक्रम राबविल्याचे त्या म्हणाल्या. आदिवासी भागातील महिलांना सामाजिक उत्सवात सामील करून घेऊन त्यांच्या चेहेऱ्यावर आनंदाची लाली आणण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

सौ. खापरे यांच्या समाजसेवेच्या सातत्याचे आणि ग्रामीण महिलांप्रती दाखवलेल्या संवेदनशीलतेचे कौतुक केले. या उपक्रमाद्वारे जवळपास संपूर्ण सरळगाव गटातील आदिवासी महिलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न झाला आहे अनेक गावांतील ज्येष्ठ महिलांनी "पहिल्यांदा आम्हाला असा सन्मान मिळतोय" अशी भावना व्यक्त केली. तरुणी व महिलांनी सौ. खापरे यांच्या समाजकार्याचे कौतुक केले.

### सामाजिक उपक्रमातून पोहचल्या घराघरात

साडी वाटपावेळी आणि हळदीकुंकू सोहळ्यादरम्यान महिलांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण होते.सौ. अश्विनी खापरे यांनी यापूर्वीही नेत्र तपासणी शिबिरे,चष्मे वाटप,महिला सक्षमीकरणउपक्रम,विद्यार्थ्यांसाठी वह्या व साहित्य वितरण उपक्रम राबवले आहेत. या उपक्रमामुळे सरळगाव गटात महिला बांधवांनी सामाजिक सोहळा, सन्मान आणि एकोपा यांचा अनोखा अनुभव घेतला. समाजसेवेची परंपरा कायम ठेवत सौ. अश्विनी खापरे यांनी "सामाजिक बांधिलकीचं नवं नात" निर्माण केल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

# भिवंडीतील शेतकऱ्यांना सवलतीत "हरभरा बियाणे" उपलब्ध

### शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा :** रब्बी हंगामात भिवंडी तालुक्यातील शेतकऱ्यांना सवलतीत "हरभरा बियाणे" मिळणार असुन त्याचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन भिंवडी कृषी विभागाने शेतकऱ्यांना केले आहे

कडधान्य क्षेत्र विकास अंतर्गत पिक प्रात्यक्षिक राबविण्याकरिता हरभरा पिकाचे " फुले विक्रांत" वाणाचे बियाणे मे. रमेश अँग्रो कृषी सेवा केंद्र, भिवंडी येथे उपलब्ध झाले आहे. हरभरा पिकाची पेरणी करू इच्छित असणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी २० किलो बियाणे बाजार भावाच्या ४५ टक्के शासकीय अनुदानावर बियाणे मिळणार असुन ५५ टक्के किंमत शेतकऱ्याला भरावी लागणार आहे. सुट्टे बियाणे मिळणार नसुन २० किलो प्रति बॅग बियाणांची २३०० रुपये किंमत असणार असुन ४५ टक्के शासकीय अनुदान म्हणजे बियाणे प्रती बॅग १०४० रुपये सवलत शेतकऱ्यांना मिळणार असून ५५ टक्के शेतकऱ्यांना म्हणजे १२६० रुपये भरुन हरभरा बियाणे मिळणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना आधार कार्ड झेरॉक्स, पेरणी करावयाचा किमान ३५ गुंठे क्षेत्राचा सात /बारा उतारा, शेतकऱ्यांचा संपर्क क्रमांक, शेतकऱ्यांने काढलेला ओळख क्रमांक (Agristak farmar Id) ही कागदपत्रे सादर करावी लागणार असुन मे. रमेश अँग्रो केम कोर्पोरेशन (खते, बियाणे, किटकनाशके, स्प्रे पंप, शेती अवजारे यांचे दुकान) ३१८ / ३,४ गोविंद निवास,नझराना कंपाऊंड, भिवंडी येथील दुकानात हरभरा पिकाचे बियाणे मिळणार असुन त्यांचा संपर्क क्रमांक 9860014060 असा असुन सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत या वेळेत बियाणे उपलब्ध होणार असून दुपारी २ ते ३ या वेळेत व रविवारी पुर्ण दीवस दुकान बंद राहणार असुन तालुक्यातील हरभरा लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी या सवलतीचा लाभ घ्यावा असे आवाहन भिवंडी कृषी विभागाने केले आहे.

# भविष्यवेध



**मंगळवार**
**१८ नोव्हेंबर २०२५**

**मेष**
व्यवसायाला पुढे नेण्यासाठी काही योजना बनवाल, ज्यामुळे तुम्हाला फक्त फायदाच होईल. बहुतेक वेळ धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यात घालवाल.

**वृषभ**
मानसिक शांती मिळेल आणि वैयक्तिक कामांवर लक्ष केंद्रित करता येईल. बँक कर्मचारी त्यांचे काम लवकर पूर्ण करतील. प्रेमाचे मित्र एकत्र वेळ घालवतील.

**मिथुन**
सामाजिक कार्यात सहभाग ओळख वाढवेल. लोकप्रियता वाढेल, तसेच जनसंपर्कही वाढेल. समस्या दूर होतील, ज्यामुळे हृदयात आनंद येईल.

**कर्क**
कुटुंबात धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन केले जाऊ शकते. तुमचे जीवन सुधारण्यासाठी तुम्ही काही सकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न कराल.

**सिंह**
नवीन व्यवसाय कराराची ऑफर मिळेल. जोडीदारासोबत घरातील कामे पूर्ण करण्यात व्यस्त असाल. वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी हा चांगला दिवस आहे.

**कन्या**
पालकांचा काही काळापासून असलेला राग आज संपेल. राजकारण आणि सामाजिक कार्यात सहभागी असलेल्यांना हा दिवस अनुकूल वाटेल.

**तुळ**
महिलांचा दिवस खूप छान जाईल. व्यवसाय आज एखाद्या महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात. घेतलेल्या कर्जातून मुक्तता मिळेल.

**वृश्चिक**
तुमचे तणाव कमी होतील. प्रेम जोडीदारासाठी हा दिवस चांगला आहे. तुम्ही एका चांगल्या रेस्टॉरंटमध्येही जाऊ शकता. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**धनु**
कुटुंबासह चित्रपट पाहण्यासाठी जाण्याचा विचार करू शकता. मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीला उपस्थित राहाल, इतर मित्रांसोबत मजा कराल .

**मकर**
र्थिक समस्या टाळल्याने तोटा टाळता येईल. तुमचे प्रवास आणि मीडियाशी संबंधित व्यवसाय बदलू शकतात. मित्राकडून काही सल्ला मिळेल.

**कुंभ**
मुलांसोबत पिकनिकला जाऊ शकता. तुम्ही त्यांच्यासोबत चांगला वेळ घालवाल. महिलांसाठी आजचा दिवस खूप अनुकूल आहे.

**मिन**
काम सुरळीतपणे पुढे जाईल. कुटुंब आणि वैयक्तिक कामांमध्ये योग्य संतुलन राखण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. घरकामात लक्ष केंद्रित कराल.



# राजधानीतील राज्याचा ऐतिहासिक वारसा, आधुनिक उद्योगशक्ती अधोरेखित करते



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली** : महाराष्ट्राचे दालन राष्ट्रीय राजधानीत राज्याचा ऐतिहासिक वारसा आणि आधुनिक उद्योगशक्ती अधोरेखित करते. हे आपल्या उद्योगविश्वासाठी आणि संस्कृतीसाठी अभिमानास्पद आहे, असे महाराष्ट्र सदनाचे निवासी आयुक्त (गुंतवणूक) श्री. सुशील गायकवाड यांनी नवी दिल्लीतील प्रगती मैदान येथे सुरू असलेल्या ४४व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्यात (IITF) महाराष्ट्राच्या दालनाला भेट दिल्यानंतर व्यक्त केले.

यावर्षी महाराष्ट्राला मिळालेल्या 'भागीदार राज्य' (Partner State) या विशेष दर्जामुळे राज्याचे दालन संपूर्ण मेळ्याचे विशेष आकर्षण ठरले आहे. राज्याची ऐतिहासिक परंपरा, समृद्ध सांस्कृतिक वारसा, आधुनिक औद्योगिक प्रगती, ग्रामीण महिलांची उद्योजकता, तसेच विविध पारंपरिक हस्तकला आणि नवउद्योजकांच्या संकल्पना—यांचा समन्वय साधणारे हे दालन महाराष्ट्राच्या सर्वंकष विकासाचे दर्शन घडवते.

भेटीदरम्यान श्री. गायकवाड यांनी दालनातील विविध विभाग व स्टॉल्सची सविस्तर पाहणी केली. त्यांनी स्वयं-साहाय्य गटातील महिलांनी सादर केलेले ताजे व पारंपरिक खाद्यपदार्थ, राज्याच्या भाषिक अभिमानाचे प्रतीक असलेल्या 'मराठी भाषा दालना'चे वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरण यांचा विशेष गौरव केला.

तसेच पैठणी साड्यांचे विणकर, कोल्हापुरी चप्पल कारागीर, चामड्याच्या वस्तू निर्माते, हँड पेंटिंग कलाकार आणि ऑर्गेनिक उत्पादने तयार करणारे उद्योजक यांच्याशी त्यांनी प्रत्यक्ष संवाद साधला. कारागीर व उद्योजकांना प्रोत्साहन देत राज्य सरकारच्या

**- निवासी आयुक्त (गुंतवणूक) सुशील गायकवाड**

धोरणांमुळे अशा स्टॉल्सला मिळणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील संधींचे त्यांनी कौतुक केले.

श्री. गायकवाड यांच्या या भेटीप्रसंगी सहायक निवासी आयुक्त श्री. नितीन शेंड उपस्थित होते. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाच्या (MSSIDC) वतीने श्री. गायकवाड यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. दालन उभारणीची संकल्पना, त्यामागील उद्दिष्टे, सहभागी विभाग आणि जिल्ह्यांची माहिती, तसेच संपूर्ण सादरीकरणाची रचना याबाबत त्यांना सविस्तर माहिती देण्यात आली.

## ठाणे महापालिकेचे बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिकेच्या विद्यमाने हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

## कल्याण पूर्वेतील अनाधिकृत जलवाहिन्या अधिकृत करा



### भाजपा महिला उपाध्यक्षा सोनी क्षीरसागर यांची केडीएमसी आयुक्तांकडे मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : अडिवली-ढोकळी व पिसवली परिसरात असलेल्या चाळ व इमारती मध्ये अनाधिकृत पाणी लाईन असून या नागरिकांकडून पाणी माफिया अनधिकृतपणे पाणीपट्टी वसूल करत आहेत. त्यामुळे या अनधिकृत पाणी लाईन अधिकृत करून या नागरिकांकडून पालिकेनेच पाणी पट्टी वसूल करण्याची मागणी भारतीय जनता पार्टीचे कल्याण ग्रामीण मंडळ 2 चे चिटणीस संदिप क्षीरसागर आणि महिला उपाध्यक्षा सोनी क्षीरसागर यांनी केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे. याबाबत त्यांनी केडीएमसी उपायुक्त कांचन गायकवाड यांची भेट घेत निवेदन दिले आहे.

गेल्या १० वर्षों पासून अडिवली-ढोकळी व पिसवली मधील हजारो चाळी व कमीत कमी ५०० किंवा त्याहुन अधिक इमारती मध्ये पाण्याच्या पाण्याचे अनाधिकृत पाण्याच्या पाण्याची लाईन आहे. आणि त्या चाळीवर इमारतीच्या पाण्याचा महसूल (पाणी माफीया) दर महा वसूल करीत आहे. जेव्हा जेव्हा विकासाचे मुद्दे केडीएमसीकडे घेऊन येतो तेव्हा कल्याण डोबिंवली महानगर पालिकेकडे निधीची कमतरता असल्याचे पालिकेचे अधिकारी सांगत असतात.

अडिवली-ढोकळी व पिसवली मधील चाळी व कमीत कमी ५०० किंवा त्याहुन अधिक इमारती मधील अनाधिकृत पाण्याची लाईन अधिकृत करण्यात यावी. त्यांच्या कडुन अधिकृतपणे (पाणी बिल) महसूल आकारण्यात यावा व या महसूलाच्या रक्कमेतून अडिवली-ढोकळी व पिसवली परिसरातील रस्ते व गटारी कामाचा विकास करण्यात यावा अशी मागणी क्षीरसागर यांनी केली आहे.

## ठाणे महापालिका क्षेत्रात कुष्ठरोग शोध विशेष अभियान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्हयामध्ये १७ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध विशेष अभियान (एल.सी.डी.सी.) राबविण्यात येत आहे. या मोहीमेमध्ये शहरी विभागात झोपडपट्टी व चाळ कार्यक्षेत्रात सर्वेक्षण घेण्यात येत असून ठाणे महानगरपालिका क्षेत्रांतर्गत एकूण ७,२२,२४६ लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्यात येत आहे.

जनतेला कुष्ठरोग व त्यामुळे येणाऱ्या विकंलागतेपासून दुर ठेवण्यासाठी भारत सरकारतर्फे कुष्ठरोग शोध अभियान दरवर्षी राबवण्यात येते. या अभियान कालावधीत घरोघरी एक पुरुष व एक महिला (आशा सेविका) यांचे पथक कुष्ठरोगाची तपासणी करण्यासाठी येणार आहे. त्यांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन ठाणे महापालिका आणि वैद्यकीय अधिकारी पर्यवेक्षकीय नागरी कुष्ठरोग पथक यांच्यावतीने करण्यात आले आहे.

या शोध अभियानामुळे कुष्ठरोग व कुष्ठरोगामुळे येणाऱ्या विकृतीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. या अभियानामध्ये निदान निश्चित झालेल्या कुष्ठरुग्णांना संपूर्ण औषधोपचार मोफत देण्यात येणार आहे. कुष्ठरोगावरील उपचार अत्यंत साधा आणि सोपा आहे. तसेच, औषधोपचाराने कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो, असे सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), ठाणे यांनी स्पष्ट केले आहे.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

## निवडणुक काळात जनतेची शांतता लोकशाहीतील वाढत चाललेला धोकादायक विराम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : निवडणुका घोषित होताच सामान्यतःउत्साह, चर्चा ,मंथन ,सभा,मेळावे,यांची गडबडात वाढायला हवी पण यंदा चित्र उलटे दिसते. गावोगावी पिण्याचे पाणी, रोजगाराच्या तक्रारी,वीज समस्या,या प्रश्नांना जणुकाही कोणीतरी जाणीवपूर्वक गाठोड्यात बांधून ठेवल्याचे चित्र आहे. कोणीतरी यासर्व प्रश्नांना कोपऱ्यात कचऱ्यासारखे फेकून दिल्याचे चित्र आहे.जनता गप्प आहे ,शांत आहे ही शांतता साधी नाही,तर ती लोकशाही थकल्याची आणि आविश्वाची खूण आहे अशी खंत पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केली आहे.

शांततेच पहिल सत्य म्हणजे लोकांना वाटतं काही बदलणार नाही. लोकशाहीची मिजास ही संवादात असते. पण जेव्हा संवाद थांबतो तेव्हां लोकांच्या मनातील निराशा तोंड उघडते.पाच वर्षात एकदाच दिसणारे लोकप्रतिनिधी निवडणुकीनंतर गायब होणाऱ्या आश्वासनांच्या रेषा आणि स्थानिक समस्यांवरील दुर्लक्ष या सर्वांनीच लोकांना शिकवून टाकले आहे की बोलून काही होत नाही ,मतदान याचाही फारसा फरक पडत नाही.ही भावना सर्वात मोठी धोक्याची घंटा आहे.कारण लोक बदलाची आशा सोडतात तेव्हा लोकशाही ढासळते हे नक्की.

दुसरे सत्य म्हणजे प्रश्नांची संख्या वाढत आहे मात्र उत्तरे नाहीशी होत आहेत.पाणी,सिंचन,वीज,रस्ते,आरोग्य,शिक्षण,शेती,रोजगार,स्वच्छता, असे गावागावात प्रश्न वाढले आहेत मात्र राजकीय पक्ष त्याच त्याच घोषणा पुन्हा पुन्हा रंगवून सांगत आहेत. जेव्हा मतदार गंभीर प्रश्नावर चर्चा,अपेक्षा करतो त्यावेळी उमेदवारांच्या भाषणात फक्त मोठे प्रकल्प,मोठी स्वप्न, यांचा गजर असतो.मात्र मतदार समजून जातो की आपल्या समस्यांची सोडवणूक कोणत्याही पक्ष्यांच्या अजेंड्यात नाही.

तिसरे सत्य म्हणजे पैसा आणि प्रचार युद्धाचे रणांगण. निवडणूक आत्ता विचाराचे मैदान राहिले नाही ती पैशाची आणि डिजिटल प्रचाराची युद्धे बनल आहेत. सर्वच बाजूंनी सोसियल मीडियावर कोट्यवधीचा वर्षाव, प्रतिमांची स्पर्धा,आणि वास्तवापेक्षा भ्रम मोठा होत चालला आहे.या चमकदार आभाळाखाली सामान्य मतदारांचे आयुष्य सावलीसारखे लहान होत चालले आहे.ज्यांचा आवाज मोठा त्यांचाच अजेंडा,याउलट विचारवंतांना जागाच उरलेले नाही.

चौथे सत्य म्हणजे मतदानाची कर्तव्य भावना कमकुवत होत चालली आहे,खरे परिवर्तन मतदानच घडवून आणू शकतो पण एक कटू सत्य म्हणजे मतदार हा मतदानापूर्वीच पराभूत झाल्यासारखा का वाटतो. कारण लोकांचा अनुभव सांगतो की रस्ते तसेच किंबहुना त्याहीपेक्षा खराब.पाणी तुटपुंजे,शेती असुरक्षित, तरुणांच्या हातात बेरोजगारीचे ओझे. मात्र पक्षीय जाहीरनामा कागदावरच ही फसवी साखळी लोकांना निराश करते.

शांततेचा पाचवा कोण म्हणजे राजकारणापासून लोकांचा हळूहळू होत चाललेला दुरावा. राजकारण हे लोकांसाठी असते .पण लोकांचे प्रश्न दूर राहिले तर आपोआप लोक राजकारणापासून दुरावतात.आज मतदारांचा दुरावा हा एक इशारा आहे.भविष्यात ही उदासीनता वाढलेली तर लोकशाही पोकळ होण्याचा धोका वाढतो.

**- सी.आर.म्हात्रे**

निवडणूक हा एक उत्सव नाही तर ती जबाबदारी आहे. मतदारांनी शांततेत न रमता प्रश्न पुन्हा आवाजात आणले पाहिजे. स्थानिक प्रश्नांना अजेंड्यात जागा दिली पाहिजे. नेत्यांचा विकास हा शब्द प्रत्यक्ष लोकहिताची जोडला गेला पाहिजे. मात्र पुढील पिढी मात्र आश्वासनाचा इतिहास वाचत राहील. आजची मतदारांची शांतता ही समाधानाची नाही तर ती पराभवाची आहे.

लोकशाहीत शांत जनता ही मजबूत सत्तेचा विजय नसतो ,ही तात्पुरती शांतता,निराशा यांचा झालेला धूर असतो.या धुरातून खरा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे. निवडणुकीत कोण बोलेल जनतेच्या प्रश्नावर?आणि सत्तेत आल्यावर कोण बोलेल जनतेच्या प्रश्नावर. एकंदरीत जागृत जनता हाच लोकशाहीचा आधार आहे असेही सी.आर . म्हात्रे यांनी सांगितले.

## 'जेव्हा ती बोलू लागते' काव्यसंग्रहाचे प्रकाशन



### जो प्रवाह भारतीय संविधानातली मूल्य मानतो, तो प्रवाह मुख्य प्रवाह आहे
**- प्रा. आशालता कांबळे**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आंबेडकरी चळवळीत कार्यकर्ता कवयित्री सुरेखा पैठणे लिखित 'जेव्हा ती बोलू लागते' काव्यसंग्रहाचे प्रकाशन कल्याण येथे आचार्य कॉन्फरन्स हॉल येथे ज्येष्ठ आंबेडकरी साहित्यिका प्रा. आशालता कांबळे, डॉ. श्यामल गरुड, प्रा.डॉ सुदाम राठोड, डॉ. विठ्ठल शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या नंदा कांबळे, सहाय्यक आयुक्त शैलेश दोंदे यांच्या हस्ते करण्यात आले. ' जेव्हा ती बोलू लागते' या कविता संग्रह पुस्तकाच्या लेखिका सुरेखा पैठणे असून ९० पानांच हे काव्यसंग्रह आहे. यात सामाजिक तर विविध प्रकारच्या कवितांचा सामवेश आहे. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील हे पहिले काव्यसंग्रह आहे.

जो प्रवाह भारतीय संविधानातली मूल्य मानतो, तो प्रवाह मुख्य प्रवाह आहे. या काव्यसंग्रहातील कविता दुःखावर , संघर्षावर मात करून विजयाची पताका फडकवणारी कविता आहे. म्हणून त्या कविता आम्हाला जवळच्या वाटतात असे यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. अशालता कांबळे यांनी बोलतांना सांगितले. आंबेडकरी स्त्रीने कुठल्याच वाटा गुंडाळल्या नाहीत. तिने समष्टीची भाकर पदरी बांधून प्रवास केलेला आहे. जेव्हा ती बोलू लागते' काव्यसंग्रहातील कविता येणाऱ्या चौथ्या आंबेडकरी पिढीची फार महत्त्वाचं प्रतिनिधित्व करेल असे यावेळी डॉ. श्यामल गरुड यांनी बोलताना सांगितले.

कवयित्री सुरेखा पैठणे यांच्या लेखणीतून साकार झालेल्या' जेव्हा ती बोलू लागते'या काव्यसंग्रहाचा उलगडा करून आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी ' जेव्हा ती बोलू लागते' काव्यसंग्रहातील कवितांचे वाचन मिलिंद जाधव, अक्षय भोईर, वैभवी अडसुळे यांनी केले. यावेळी प्रा. सिद्धार्थ मोरे, बबन सरवदे, छाया कोरेगावकर, सिंधु रामटेके, उत्तम जोगदंड, शिवा इंगोले, राज असोरोंडकर, सुधीर चित्ते, शिवाजी रगडे तर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## गावठी पिस्तुल, काडतुसांसह सराईत गुन्हेगार रोशन झा'ला अटक



### सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्य पथकाने गोकुळधाम टॉवर परिसरात सापळा रचला.

**कल्याण गुन्हे शाखेची कारवाई**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या धडक कारवाईत डोंबिवली पूर्वेकडील गोकुळधाम टॉवरमध्ये राहणाऱ्या सराईत गुन्हेगार रोशन झा याला गावठी पिस्तुलांसह जिवंत काडतुसे व विविध घातक शस्त्रसाठ्यासह अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्य पथकाने गोकुळधाम टॉवर परिसरात सापळा रचला. पोलिसांनी रोशन झाच्या घरावर छापा टाकत ३ गावठी पिस्टल, ३ जिवंत काडतुसे, २ मॅग्झिन, एक खंजीर, दोन चाकू, दोन तलवारी असा मोठा शस्त्रसाठा जप्त केला. रोशन झा हा सराईत गुन्हेगार असून उल्हासनगरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये त्याच्याविरोधात सात गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या शस्त्रांचा पुरवठा कुठून झाला? आणि कोणाकडे विक्रीसाठी नेण्यात येत होता? याचा तपास पोलीस करत आहेत.

दरम्यान, रोशन झा याला स्थानिक काही राजकीय नेत्यांचा आश्रय असल्याची चर्चा सुरू असून पोलिसांनी या दिशेने देखील तपास सुरू केला आहे. क्राईम ब्रांचच्या तत्पर कारवाईमुळे शहरातील संभाव्य गुन्हेगारी कट उधळला गेल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. या गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, युनिट-३, कल्याणचे सहा पो निरीक्षक सर्जेराव पाटील हे करीत आहेत. हि कामगिरी कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे, सहा. पो. निरी. सर्जेराव पाटील, सहा पो. निरी बळवंत भराडे, पोउपनिरी विनोद पाटील, किरण भिरो, रापोउपनिरी दत्ताराम भोसले, राहा.पो.उप निरी बालाजी शिंदे, पोहवा सपोउपनि बोरकर, पोहवा सुधीर कदम, विजय जिरे, प्रशांत वानखेडे, सचिन भालेराव, गोरक्षनाथ पोटे, विलास कडु, आदिक जाधव, भांगरे, खंदारे, पोना प्रविण किनरे, दिपक महाजन, पोशि सतिश सोनवणे, गुरूनाथ जरग, गणेश हरणे, गोरक्ष शेकडे, जालिंदर साळुंखे सर्व नेम गुन्हे शाखा, घटक-३, कल्याण यांनी केलेली आहे.

# भिवंडीत रस्ता रुंदीकरणाच्या कामाचा शुभारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : अंजुर फाटा ते स्वर्गीय राजीव गांधी चौक रस्ता रुंदीकरणाच्या कामास सकारात्मक प्रतिसाद देत अनेक दुकानदारांनी महानगरपालिकेच्या कारवाईच्या पूर्वसंध्येलाच स्वतः अतिक्रमण हटवत साहित्य काढण्याचे काम केले, याबद्दल संबंधित नागरिकांचे मनःपूर्वक आभार.

भिवंडी शहराच्या विकासासाठी महत्वपूर्ण अशा रस्ता रुंदी करण्याच्या कामास मा प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर यांच्या निर्देशानुसार सुरवात झाली.

मा अतिरिक्त आयुक्त श्री विठ्ठल डाके आणि मा उपायुक्त (अनधिकृत बांधकाम) श्री विक्रम दराडे यांचे नियंत्रणाखाली आज अंजूर फाटा ते स्व राजीव गांधी चौक या मार्गावरील रस्ता रुंदीकरण काम प्रभाग समिती क्र. 4 चे सहायक आयुक्त गिरीश घोष्टेकर व प्रभाग समिती क्र. ५ चे सहायक आयुक्त सईद चीवणे यांच्या नियंत्रनाखाली या सर्व बाधित प्रकल्पांची तोडकाम करण्यात आले. प्रभाग समिती क्र.४ मध्ये 351 इतक्या घरांना नोटीस देण्यात आल्या होत्या, त्यापैकी आज 107 इतक्या घरांचे तोडकाम पूर्ण करण्यात आले, तरी उर्वरित कार्यवाही हि उद्या दि. 18-11-2025 रोजी करण्यात येणार आहे. तसेच प्रभाग समिती क्र. ५ अंतर्गत 23 इतक्या घरांना नोटीस देण्यात येऊन आज सर्व घरांचे तोडकाम पूर्ण करण्यात आले. याकामी पुरेसा मनुष्यबळ, एकूण 6 जे.सि.बी व 6 डम्पर असे साधन सामुग्री तसेच पोलीसांकडूनही पुरेसा मनुष्बळ उपलब्ध करून देण्यात आले होते.

आजच्या कारवाई वेळी प्रभाग समिती क्रमांक १ चे सहायक आयुक्त मकसूम शेख, प्रभाग समिती क्रमांक २ चे सहायक आयुक्त माणिक जाधव, प्रभाग समिती क्रमांक ३ चे सहायक आयुक्त सुरेंद्र भोईर, शहर विकास प्रमुख समीर जवरे, अतिक्रमण विभाग प्रमुख अरविंद घुगरे, महानगरपालिकेचे सर्व अभियंता व वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

आजच्या या रस्ता रुंदीकरणाच्या कामात बाधित ठरणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना महानगरपालिके तर्फे खालील लाभ देण्याचे नियोजन आहे.

**शहरात नियमित होणारी वाहतूक कोंडी यावर उपाय करीत असताना शहर विकासासोबतच मेट्रो प्रकल्प पाच राबवित असताना रस्ते रुंदीकरण आवश्यक असून सध्या 24 मीटर रुंद असलेले रस्ते विकास आराखड्यात नमूद 36 मीटर करणे गरजेचे आहे.यामध्ये बाधित मालमत्ता धारकांना उचित नुकसान भरपाई भविष्यात देण्याचा प्रस्ताव आहे.तत्पूर्वी बाधित मालमत्ता धारकांनी या रस्ते रुंदीकरण कार्यात सहकार्य करणे गरजेचे आहे.**
**- आयुक्त अनमोल सागर**

*लाभाचे स्वरूप:-

* पात्र प्रकल्पबाधित नागरिकांना TDR स्वरुपात लाभ देणार
* पात्र लाभार्थ्यांना रोख रक्कम स्वरुपात लाभ मिळण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवणार
* आगामी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत प्रकल्पांतर्गत पात्र प्रकल्प बाधितांसाठी २०% सदनिका राखीव ठेवणार.
* जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न महानगरपालिका करणार.
* आजच्या करवाईमध्ये पात्र दुकानदारांसाठी भविष्यात कमर्शियल काम्प्लेक्स उभारणार.*

**रस्ता रुंदीकरण व शहराचा विकासकामात सहकार्य करणाऱ्या सर्व नागरिकांचे मनपूर्वक धन्यवाद!!**

अशाच प्रकारचे विकास कामांकरिता सर्व नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनतर्फे करण्यात आले आहे

# महाड तालुका समाजसेवा संघाच्या अध्यक्षपदी सुभाष म्हस्के



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील महाड तालुका मराठा समाज सेवा संघाच्या अध्यक्ष पदावर सुभाष म्हस्के यांची एकमताने निवड झाली आहे. कल्याण पूर्व मध्ये महाड तालुका समाजसेवा संघ कल्याण यांची संस्था आहे. स्वतःचा हॉल आहे. प्रत्येक तीन वर्षांनी अध्यक्षांची निवड होते. या निवडीमध्ये माजी परिवहन समिती सभापाती सुभाष म्हस्के यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. रविवारी संस्थेची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा होती त्यामध्ये हि नियुक्ती जाहीर करण्यात आली. यावेळी विश्वस्त प्रमुख सुरेश म्हस्के, विश्वस्त विलास उत्तेकर, दत्तात्रय डिगे, अरुण भोसले, नितीन साळुंखे, अध्यक्ष दत्ताराम साळुंखे, सरचिटणीस काशिनाथ मांढरे, उपाध्यक्ष रमेश चव्हाण, कार्याध्यक्ष अनंत जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते. म्हस्के यांच्या निवडीनंतर कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांच्यासह इतर अनेक मान्यवरांनी आणि नागरिकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# बेलापूर न्यायालयात प्रतिध्वनीत बालहक्कांचा आवाज





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** बालदिना निमित्ताने १४ नोव्हेंबर २०२५ रोजी कौटुंबिक न्यायालय, बेलापूर येथे समाज प्रबोधनासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, तालुका विधी सेवा समिती, बेलापूर, नवी मुंबई वकील संघटना आणि टिळक महाराष्ट्र विधी विद्यालय, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने 'बालकांचे हक्क' या विषयावर 'थोडा पॉज' या पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले.

या उपक्रमाची संकल्पना कौटुंबिक न्यायालयाचे माननीय न्यायाधीश सुभाष काफरे यांची होती.नवरा–बायकोच्या कौटुंबिक वादांचा निर्दोष मुलांवर होणारा मानसिक परिणाम, तसेच अनेकदा मुलांचा वादात 'हत्यार' म्हणून होणारा गैरवापर या गंभीर सामाजिक विषयावर प्रकाश टाकणारे हे पथनाट्य टिळक विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. प्राध्यापिका वर्षा बडवे आणि सहायक प्राध्यापिका प्राजक्ता बालवीर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या या नाट्यातून कौटुंबिक सौहार्दाचे महत्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले.दांपत्यातील सततच्या भांडणांमुळे मुलांच्या मनावर ताण, भीती, अभ्यासात ढासळणारी एकाग्रता आणि आत्मविश्वास कमी होण्याची समस्या वाढत आहे. अशा परिस्थितीत पालकांनी घटस्फोटाचा निर्णय घेण्यापूर्वी मुलांच्या भविष्यासाठी एकदा तरी विचार करावा, हा मोलाचा संदेश पथनाट्याद्वारे समाजास देण्यात आला.या कार्यक्रमात नवी मुंबई वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. सुनिल मोकल, उपाध्यक्ष ॲड. संदीप रामकर, सचिव ॲड. विकास म्हात्रे आणि कार्यकारिणी सदस्य यांच्या वतीने पथनाट्य सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशास्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. नाझनीन शेख यांनी केले.कार्यक्रमाला कौटुंबिक न्यायालयाचे विवाह समुपदेशक भारत काळे, प्रबंधक जी. एस. हिरवे, सहायक अधिक्षक राजेश म्हात्रे, लघुलेखक विजय पोटे आणि कुलदीप जाधव, वरिष्ठ लिपिक के. पी. किर्वे, कनिष्ठ लिपिक निलम भोसले, अक्षता कोळसुंदकर, सहाय्यक राज निकम, प्रीती नन्नावरे, तसेच पोलीस कर्मचारी सुनिछ बातेरे आणि पल्लवी देशमुख यांच्यासह वकील, पक्षकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या पथनाट्यामुळे विवाहित दांपत्यांमधील तणाव कमी होण्यास, घटस्फोटाच्या वाढत्या संख्येत घट करण्यास आणि घरातील सौहार्द जपण्यासाठी समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी मदत होईल, असे उपस्थितांनी व्यक्त केले. एकंदरीत, 'थोडा पॉज' या पथनाट्याने समाजाला कौटुंबिक मूल्यांचा आणि मुलांच्या मानसिक आरोग्याचा अत्यंत महत्त्वाचा संदेश दिला.

# मुरबाड नगरपंचायतचे नगराध्यक्ष संतोष चौधरी यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश!



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड नगरपंचायत मधील भाजपची सत्ता उलथवून 7 भाजप व 2 अपक्ष सदस्यांनी परिवर्तन पॅनल स्थापन केले होती. त्यातील 8 सदस्यांनी काही दिवसांपुर्वी शिवसेना शिंदे गटात प्रवेश करून भाजपला धक्का दिला होता मात्र नगराध्यक्ष संतोष चौधरी यांनी या 8 नगरसेवकांबरोबर शिवसेनेत प्रवेश न करता परिवर्तन पॅनल मध्ये राहणे पसंत केले होते. त्यानंतर वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या होत्या. आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसाला संतोष चौधरी यांनी हजेरी लावल्याने तसेच भाजपाच्या नगरसेविका माजी उपनगराध्यक्ष मानसी देसले यांच्या प्रभागात विकास कामाच्या भूमी पूजनासाठी उपस्थिती दर्शवून मुरबाडच्या राजकारणात संभ्रम निर्माण केला होता.तसेच त्यांनी काही दिवसापूर्वी मुरबाडच्या जनतेच्या जे हिताचे असेल तो निर्णय मी योग्य वेळी घेणार असल्याचे म्हटले होते.

आता त्यांनी दोन दिवसापूर्वी खासदार श्रीकांत शिंदे , वामन म्हात्रे,राम दुधाळे, मोहन गडगे,विकास वारघडे, नंदकुमार जाधव यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे सेनेत प्रवेश करून भाजप व परिवर्तन पॅनलला रामराम ठोकला. त्यांच्या या प्रवेशामुळे मुरबाड नगरपंचायत वर शिवसेना शिंदे सेनेचा निर्विवाद झेंडा लागला असून मुरबाडच्या राजकारणात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी पूर्वी अजून किती घडामोडी घडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भिवंडी : मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी कल्याण नाका -अंजुर फाटा रस्त्याचे रुंदीकरण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहराचा विकास व मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी रस्ता रुंदीकरण गरजेचे असल्याने महापालिकेने याबाबतीत पुढाकार घेत अंजुर फाटा ते कल्याण नाका या मुख्य रस्ता लगत असलेली दुकान व अतिक्रमण तोडून परिसरात रस्ता रुंदीकरण कामास सुरुवात केली.या रस्ता रूंदीकरणाला नागरिकांचा विरोध होईल ही अपेक्षा असल्याने महापालिका प्रशासनाने विशेष पोलीस बंदोबस्त घेतला होता. पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे अनुचित प्रकार घडू नये यासाठी घटनास्थळी उपस्थित होते.



कल्याण नाका ते कमला हॉटेल या ठिकाणी महापालिकेच्या अतिक्रमण विभाग कर्मचारी व प्रभाग अधिकारी यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन जेसीबीच्या सहाय्याने तोडू कारवाईस सुरुवात केली. तर अंजुर फाटा येथून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी रस्ता रुंदीकरण कामास सुरुवात केली. अंजूरफाटा ते कल्याण नाका रस्ता लगतच्या अनेक मालमत्ता धारक व्यावसायिकांनी दुकानातील,निवासी फ्लॅट्स मधील कुटुंबीयांनी महापालिका आयुक्त प्रशासनाने अतिक्रमण काढणे संदर्भात यापूर्वीच नोटीस बजावली होती. त्यामुळे अनेकांनी स्वतःहून आपले दुकानातील सामान व साहित्य रविवार पासून हलविण्यास सुरवात होती. शहरात होणाऱ्या विकास कामासोबत,रस्ते रुंदीकरण यास आमचा विरोध नसून हे करीत असताना पालिका प्रशासनाने बाधित मालमत्ता धारकांना विश्वासात घेणे गरजेचे होते अवघ्या दहा दिवसापूर्वी नोटीस बजावून दिल्यानंतर चर्चा करणे आवश्यक होते मात्र तसे न करता महापालिका आयुक्त प्रशासनाने तोडू कारवाई केली ही अयोग्य असल्याचे मत उपस्थित बाधित नागरीकांनी व्यक्त केले. बाधित मालमत्ता धारकांना तात्काळ पंचनामे करून त्यांना योग्य तो मोबदला दिला गेला पाहिजे. अशी मागणी बाधित मालमत्ता धारकांनी यावेळी केली.

तर रस्ता रूंदीकरण केल्यानंतर तातडीने रस्त्यावर पडलेला माती चे ढिगारे तातडीने उचलून रस्त्यावर डांबरीकरण करून रस्ता तयार करण्यात यावा अनेक ठिकाणी रस्ता रूंदीकरण केल्यानंतर महापालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने रस्त्याची

### रस्ता रुंदीकरणासाठी तोडू कारवाई सुरू

दुरावस्था होत आहे. हातगाडी व फेरीवाले आपली दुकान थाटून रस्त्यावर अडथळा निर्माण करून राजरोसपणे आपला व्यवसाय करीत आहेत असल्याचे चित्र सध्या सर्वत्र दिसत आहे अशी मागणी महापालिकेच्या माजी नगरसेवकांनी व्यक्त केले आहे.

शहरात नियमित होणारी वाहतूक कोंडी यावर उपाय योजना करीत असताना शहर विकासा सोबतच मेट्रो प्रकल्प पाच कार्यान्वित करण्यासाठी रस्ते रुंदीकरण आवश्यक असून सध्या २४ मीटर रुंद असलेले रस्ते विकास आराखड्यात नमूद ३६ मीटर करणे गरजेचे आहे.यामध्ये बाधित मालमत्ता धारकांना उचित नुकसान भरपाई भविष्यात देण्याचा प्रस्ताव आहे.तत्पूर्वी बाधित मालमत्ता धारकांनी या रस्ते रुंदीकरण कार्यात सहकार्य करणे गरजेचे आहे अशी प्रतिक्रिया आयुक्त अनमोल सागर यांनी दिली आहे.

# वासिंद,पिवळी– वाडा बससेवा पूर्ववत सुरू करा

## नागरिकांची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)** : गेल्या जून महिन्यापासून वासिंद- वाडा व पिवळी- वाडा ही बससेवा बंद असल्याने या मार्गावरून प्रवास करणारे प्रवासी, विद्यार्थी यांची प्रचंड गैरसोय होत असून ही बस पूर्ववत सुरू करावी अशी मागणी होत आहे .

गेल्या जून महिन्यात वासिंद-कांबारे रस्त्यावरील सावरोली गावाजवळील असलेल्या तानसा नदीवरील पुलाला तडे पडल्याचे निर्दशनास आल्याने या पुलावरून वाहतूक करणारी अवजड वाहने बंद करण्यात आली होती. त्यामुळे या वाडा बसस्थानकातून येणारी वासिंद व पिवळी या दोन्ही बससेवा बंद ठेवण्यात आली आहे. ही बस वाहतूक सेवा सुरू नसल्याने प्रवासी व विद्यार्थ्यां, चाकरमानी भाजीपाला विक्रेते, दुग्ध व्यवसायिक यांची प्रचंड गैरसोय होत असून ही बस सेवा लागली सुरू करावी अशी मागणी या मार्गावरील लोकांनी केली आहे . या मार्गावरील या बस सेवेला प्रचंड प्रतिसाद मिळत असून मोठ्या प्रमाणात आर्थिक उत्पन्नही महामंडळाला मिळत असते तरीसुद्धा आगार व्यवस्थापक यांनी जाणून-बुजून दुर्लक्ष केल्याने आज पर्यंत ही बस सेवा बंद आहे त्यामुळे एकीकडे महामंडळाचे प्रचंड नुकसान होत असून या मार्गावरील प्रवासी चाकरमानी विद्यार्थी यांच्या प्रचंड गैरसोयी मुळे संताप व्यक्त होताना दिसत आहे

येथील वासिंद, पिवळी भागाकडून वाड्याकडे जाणारी कुठलीच वाहतूक सेवा नाही त्यामुळे वाडा आगारातून दुपारी वासिंद तर सकाळी दोन व सायंकाळी एक अशी पिवळी गावापर्यंत बससेवा वाहतूक सेवेत होती. यामुळे या भागातील विद्यार्थी व नागरीकांना प्रवास करणे सोईस्कर ठरत होते. परंतु सावरोली पूलाची अद्याप दुरुस्ती झाली ती दुरुस्ती बांधकाम विभागाने लक्ष देऊन लागलीच करावी म्हणजे पिवळी व वासिंद ही बंद असलेली बससेवा तात्काळ सुरू होऊन येथील नागरिकांना होणारा त्रासदायक प्रवास सुखर होईल.

# इनर व्हील क्लब ऑफ कल्याण डायमंड्सच्या वतीने आरोग्य शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** पश्चिमेकडील कै. भाऊराव पोटे माध्यमिक विद्यालयामध्ये इनर व्हील क्लब ऑफ कल्याण डायमंड्सच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन नुकतेच करण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.शिबिरामध्ये इनर व्हील क्लब ऑफ कल्याण डायमंड्सच्या अध्यक्षा डॉ. तृप्ती बोबडे यांनी दातांच्या आरोग्यासंबंधी तसेच पौष्टिक आहाराचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. सध्या बाजारात पाच रुपयांत मिळणारे बटाटा वेफर्स, मैद्याचे पदार्थ, जंक फूड यापासून दूर राहण्याचा सल्ला देत घरातील चहा, चपाती, भाज्या, टोमॅटो, काकडी, पालेभाज्या यांसारख्या पौष्टिक आहाराचे महत्त्व विषद केले.

यावेळी विद्यार्थ्यांची नेत्र व दंत तपासणी करण्यात आली. दात व डोळे हे आरोग्याचे महत्वाचे घटक असल्याचे सांगत नेत्ररोग तज्ञ डॉ. अर्चना लावणकर, दंतशल्य चिकित्सक डॉ. पुनम चव्हाण आणि डॉ. वैशाली घोणे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला शाळेचे संस्थाचालक बिपिन पोटे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक सुरेश वामन उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन विकास चौधरी व संतोष सातपुते यांनी केले. शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मोठी मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# राज्यात कुष्ठरोग आता "नोटिफायबल डिसीज"

## सर्व नव्या रुग्णांची नोंदणी शासनाला कळविणे बंधनकारक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** राज्य सरकारने कुष्ठरोगाला नोटिफायबल डिसीज म्हणून घोषित केले आहे परिणामी राज्यातील सर्व डॉक्टरांना कुष्ठरोगाचे निदान झालेल्या रुग्णांची नोंद दोन आठवड्याच्या आत आरोग्य विभागाकडे करणे बंदरकारक असणार आहे. राज्यात कुष्ठरोगाचा प्रादुर्भाव रोखणे आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावे त्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टरियम लेप्रे या जंतूमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. त्वचा परिघीय नसा, डोळे आणि अन्य अवयवावर त्याचा परिणाम होतो या आजाराबद्दल अजूनही भीती, गैरसमज आणि भेदभाव दिसून येतो. लवकर निधान न झाल्यास आणि उपचारात विलंब झाल्यास रुग्णांमध्ये विकृती निर्माण होते. त्यामुळे वेळेत निदान आणि औषधोपचार हे कुष्ठरोग नियंत्रणाचे प्रमुख उपाय असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे.

राज्य शासनाने 2027 पर्यंत कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये संसर्गाची साखळी पूर्णपणे तोडणे, प्रसार शून्यावर आणणे, मुलांमधील विकृतीचे प्रमाण शून्य करणे आणि कुष्ठरोगाविषयी समाजातील भेदभाव नष्ट करणे या बाबींचा समावेश आहे. कुष्ठरोग नियंत्रणासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील सर्व डॉक्टर पॅथॉलॉजिस्ट सूक्ष्मजीव शास्त्रज्ञ आरोग्य कर्मचारी आणि क्षेत्रीय अधिकारी यांनी निधान झालेल्या सर्व रुग्णांचा योग्य उपचार, पाठपुरावा तसेच त्यांच्या संपर्कातील व्यक्तींना संसर्ग होऊ नये म्हणून उपचार देणे आवश्यक आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये 390 कुष्ठरुग्ण औषध उपचाराखाली आहेत. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने सर्व वैद्यकीय व्यावसायिकांना कुष्ठरोग निदान व नोंदणी संबंधीच्या नियमांचे पालन करावे अशा सूचना दिल्या आहेत.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, आरोग्य विभागाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी, कुष्ठरोग सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ.प्राची नेऊळकर यांनी नागरिकांना ही कुष्ठरोगाबाबत भिती बाळगू नये, लक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# एमआयडीसी निवासी मध्ये पुन्हा पाण्याचा तुडवडा

## नागरिक पाण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींवर वैतागले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** एमआयडीसी निवासी आणि आजूबाजूचा ग्रामीण परिसरातील पाणी प्रश्नाविषयी मोठा ज्वलंत प्रश्न निर्माण झाल्यावर व एका दिव्यांग वयोवृद्ध व्यक्तीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्यावर स्थानिक आमदार, सर्वपक्षीय पदाधिकारी आणि सर्व नागरिकांनी 7 नोव्हेंबर रोजी डोंबिवली एमआयडीसी कार्यालयावर धाव घेऊन अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते.

त्यानुसार दुसऱ्या दिवसापासून पाणी पुरवठा जास्त दाबाने येण्यास सुरवात झाली होती. यानिमित्त सर्वांनाच हायसे वाटून हा प्रश्न सुटल्याने आनंद झाला होता. काही राजकीय पदाधिकाऱ्यांनी याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला. पण आता गेल्या चार दिवसांपासून पुन्हा पाण्याचा दाब कमी झाला असून तेही पाणी ठराविक वेळेत येत असल्याने पाण्याचा प्रचंड तुडवडा भासत असल्याने नागरिकांचा भ्रमनिरास झाला असून पुन्हा येरे माझ्या मागल्या प्रमाणे पाणी येत नसल्याने नागरिक वैतागले आहेत. येणाऱ्या महापालिका निवडणुकीत याचा जाब उमेदवार आणि राजकीय पदाधिकाऱ्यांना जरूर विचारून मतदान कोणाला करायचे की नोटाला करायचे हे आम्ही ठरविणार असे काही नागरिक आता नैराश्याने बोलू लागले आहेत. त्यामुळे येणाऱ्या ऐन निवडणुकीत पाणी प्रश्न पेटणार हे दिसत आहे.

एमआयडीसी निवासी मधील काही रहिवाशी सोसायटी/ बंगले आणि ग्रामीण परिसरात पुन्हा पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याने एमआयडीसी निवासी-सुदामानगर मधील नवसंकुल सोसायटी मधील रहिवाशांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने तेथील रहिवाशी सुदेश बेर्डे यांनी उदिग्न होऊन चीड व्यक्त केली असून जर आम्हाला अत्यावशक गरज असलेले पाणी हे धरणात भरपूर पाणी असूनही आणि चांगला पाऊस पडला असतानाही का प्रशासन देऊ शकत नाही याचे उत्तर त्यांनी द्यावे अशी मागणी केली आहे. मिलापनगर मधील बंगल्यात राहणारे राजीव देशपांडे यांनीही संताप व्यक्त करून एमआयडीसी आणि राजकारण्यांना यासाठी दोष दिला आहे. निवासी भागात पाण्याबरोबर गटारी/नाले, स्वच्छता, भूमिगत सांडपाणी वाहिन्या, धोकदायक इमारती/ रिडेव्हलपमेंट, विजपूरवठा इत्यादी प्रश्न, तक्रारी आहेत. त्यांचाही निपटारा लवकरच झाला पाहिजे अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

# विजय गायकवाड यांची ठाणे जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**झिडके- अंबाडी :** महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद,नगरपंचायत,महानगरपालिका सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघ.ठाणे जिल्हाध्यक्ष पदी भिवंडी तालुक्यातील आदर्श सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक विजय गायकवाड यांची राज्यसंघाचे राज्य अध्यक्ष शिवानंद भरले व राज्य संघाचे सरचिटणीस रामराव वऱ्हाड यांनी लेखी पत्राद्वारे आज दिनांक- 17/11/2025 रोजी केल्याबद्दल कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त शिक्षक संघाची राज्य कार्यकारी मंडळाची सभा 28 जुलै 2025 रोजी पुणे येथील शिक्षक भवनात संपन्न झाली.या मंडळातील सभेत विषय क्रमांक-9 ठराव क्रमांक-15 अन्वये



ठाणे जिल्हा अध्यक्ष पदावर विजय गायकवाड यांची एकमताने निवड केली आहे.व उर्वरित जिल्हा कार्यकारिणी तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुका कार्यकारिणी नियुक्तीबाबत विजय गायकवाड यांनी आपल्या अधिकारातील समित्या गठीत करण्याचेही सुचित केले आहे.

विजय गायकवाड यांनी आपल्या एकूण सेवेत राज्य संघटनेत पदाधिकारी म्हणून काम केले आहे.तसेच ठाणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष,ठाणे जिल्हा परिषद शिक्षण समिती सदस्य,ठाणे-पालघर जिल्हे प्राथमिक शिक्षक पतपेढी संचालक आदि महत्त्वपूर्ण पदांवर उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल या कार्याची विशेष दखल घेऊन सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष शिवानंद भरले यांनी एक अनुभवी व सद्यस्थितीत पत्रकार क्षेत्रात कार्यरत असणारे शिक्षक व शिक्षणाबद्दल तळमळ असणारे व्यक्तिमत्त्व विजय गायकवाड यांची केलेली निवड ही योग्यच आहे.त्यामुळेच त्यांचे विविध क्षेत्रातील व्यक्तींकडून अभिनंदन केले जात आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024